महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२. फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्रमांक-उशिसं/बी.एड./इंटिग्रेटेड/प्र.क्र.२८-१७/सीईटीसेल/ ४२३८ दिनांक: ०४.०४.२०१८

परिपत्रक

संदर्भ : -

१. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८,
२. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.-बीएड-४६१५/प्र.क्र.२१०/मशि-२, दिनांक २१.०१.२०१६,
३. शासनपत्र क्र.बीएड-४६१७/प्र.क्र.३८/मशि-२, दिनांक ३१.०५.२०१७
४. शासनपत्र समक्रमांक दिनांक २९.०५.२०१७ व दिनांक २९.०७.२०१७
५. शासनपत्र क्र.बीएड-४६१७/प्र.क्र.३८/मशि-२, दिनांक २१.११.२०१७.

**विषय : बी.ए.बी.एड. / बी.एस्सी.बी.एड. एकात्मिक ४ वर्षीय अभ्यासक्रम आणि बी.एड-एम.एड. एकात्मिक ३ वर्षीय अभ्यासक्रमाच्या शैक्ष. वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रकियेबाबत . .**

१. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ अन्वये महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद केलेली आहे.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था ( प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम २ च्या खंड (द) आणि कलम ३ ची पोटकलमे (१) व (२) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने संदर्भ क्र. २ अन्वये शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम हे व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित व अधिसूचित केलेले आहेत. सदरहू अभ्यासक्रमामध्ये बी.ए.बी.एड. / बी.एस्सी.बी.एड. एकात्मिक ४ वर्षीय अभ्यासक्रम आणि बी.एड-एम.एड. एकात्मिक ३ वर्षीय अभ्यासक्रमाचा देखील समावेश आहे.

३. शासन अधिसूचनेअन्वये बी.ए.बी.एड. / बी.एस्सी.बी.एड. एकात्मिक ४ वर्षीय अभ्यासक्रम आणि बी.एड-एम.एड. एकात्मिक ३ वर्षीय अभ्यासक्रम हे व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून अधिसूचित केलेले असल्याने संदर्भिय शासनपत्रान्वये प्राप्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून बी.ए.बी.एड. / बी.एस्सी.बी.एड. एकात्मिक ४ वर्षीय अभ्यासक्रम आणि बी.एड-एम.एड. एकात्मिक ३ वर्षीय अभ्यासक्रमाचे प्रवेश हे राज्य सामाईक प्रवेश परीक्षेतून केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे होणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था ( प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करुन दिलेला कोणताही प्रवेश रद्दबातल ठरविण्याबाबत तरतूद असल्याने आपण आपल्या अधिनस्त असलेल्या उपरोक्त अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना सन २०१८-१९ च्या प्रवेशप्रक्रियेबाबत उक्त नमूद केल्या प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक असल्याची बाब अवगत करावी.

५. विषयांकित प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल तसेच सदरहू अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचे नाव, पुर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी, व प्रवेश क्षमता यांची माहिती संचालनालयास तात्काळ सादर करण्यात यावी.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रति -

१. सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य
   २/- उपरोक्त परिपत्रक अकृषि विद्यापीठे व संबंधित महाविद्यालयांच्या निदर्शणास आणून देण्यात यावे.
३. सांख्यिकी अधिकारी, प्रस्तुत कार्यालय
   २/- उपरोक्त परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१